नि.फौ.ख.क्रं.१५४/२०२२
सरकार वि. विनोद + १
नि.क्र.२४

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी.</u>

मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि खऱ्याशिवाय काहीही सांगणार नाही –

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | कुंदन किशोर लांजेवार, |
| वय सुमारे | : | ३६ वर्ष, व्यवसाय– पोलीस पाटील, |
| निवासस्थान | : | बाचेवाडी, |
| तालुका | : | पवनी, जिल्हा: भंडारा. |

<u>सरतपास</u> — <u>सहा</u>. <u>सरकारी वकील एन.के.गणवीर साहेब यांच्यामार्फत</u>–

**१.** पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले होते. पोलीसांनी मला दिनांक १७/०५/२०२२ रोजी आसगाव ते रनाळा रोडवरील नहराजवळ बोलावले होते. घटनास्थळी पोलीस पाटील खांदाळे आणि मेजर नागरीकर होते. माझ्यासमक्ष पंचनाम्याची कार्यवाही करण्यात आली होती. पंचनामा ट्रकबाबत होता. आता मला सुचनापत्र, घटनास्थळ पंचनामा आणि जप्ती पंचनामा दाखवण्यात आले. त्यावर माझया सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **निशाणी क्रमांक २५ ते २७** देण्यात येतात. ट्रकचा क्रमांक पीबी/६५/एएच–७४१५ असा होता. पोलीसांनी ट्रक ड्रायव्हर कडून ट्रक जप्त केला होता. तो ट्रक ड्रायव्हर आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

<u>उलट तपास आरोपींतर्फे वकील डी.एल.देशमुख साहेब यांच्यामार्फत –</u>

२. पंचनाम्याबाबत सूचनापत्र पोलीसांनी मला दिनांक १७/०५/२०२२ रोजी सकाळी ११:०० ते ११:३० वाजेच्या दरम्यान दिले होते. नागरीकर यांनी मला सूचनापत्र दिले होते. त्यांनी माझ्या घरी सूचनापत्र आणुन दिले होते. ते सूचनापत्र ट्रकच्या पंचनाम्याबाबत होता. पोलीसांनी माझ्यासमक्ष रिकामा ट्रक जप्त केला होता. हे म्हणणे खरे आहे की, ट्रकचा क्रमांक मी हातावर लिहुन आणला. हे म्हणणे खरे आहे की, हातावर लिहीलेला क्रमांक बघुन मी न्यायालयात सांगितला. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ आणि जप्ती पंचनामा पोलीसांनी आधीच तयार करुन ठेवला होता. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी पोलीसांनी खुणा

करून ठेवल्या होत्या त्या ठिकाणी मी सहया केल्या. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यासमक्ष पंचनामे बनवण्यात आले नव्हते. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, पंचनामे अर्धे बनवून झाले होते आणि उर्वरीत त्याच्या समक्ष बनवण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यात काय लिहीले आहे हे पोलीसांनी मला वाचुन दाखवले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनामे वाचले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामे वाचल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस पाटील असल्यामुळे पोलीसांच्या दबावाखाली मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास – काही नाही**.

| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
|---|---|
| स्वा/– | स्वा/– |
| **(व्ही. आर. फरकुंडे)** | **(व्ही. आर. फरकुंडे)** |
| न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे. (न्या.क्र.२), | न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., (न्या.क्र.२) |
| पवनी. | पवनी. |
| २०/१२/२०२५ | २०/१२/२०२५ |